# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/2818/2024-25 दि.14/01/2025

ई-ऑफिस फाईल क्र.1065867 दि.09/01/2025 रोजीची मंजूरी

## // आदेश //

पर्यावरण वन आणि बदल अधिसुचना नवी दिल्ली दि.29 मार्च 2016 पारीत केली आहे. सदर Construction & Demolition Act 2016 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्या क्षेत्रात सार्वजनिक मोकळ्या जागा, रस्ते, पदपथ, चौक व इतर ठिकाणी टाकण्यात आलेले बांधकाम टाकाऊ साहित्य, माती, डेब्रीज उचलुन त्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक केले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने मुंबई विकास प्राधिकरण हवेतील गुणवत्ता AQI (Air Quality Index) खालावल्याने सु मोटू जनहित याचिका क्र.3/2023 दाखल करुन घेतली आहे. हवेची गुणवत्ता सुधारणेकामी विविध उपाययोजना करणेकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तसेच मुंबईतुन व इतर ठिकाणाहून येणाऱ्या अज्ञात वाहनाद्वारे मोठ्या प्रमाणात माती व डेब्रीज तसेच नागरीकांमार्फत इमारत, फ्लॅट, दुकान दुरुस्ती कामातून निघालेली रॅबिट, टाकाऊ साहित्य वस्तु मोकळ्या जागेत, सार्वजनिक रस्ते, चौक या रात्रीच्या वेळीस टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

मनपा क्षेत्रात अज्ञात वाहनाद्वारे अनधिकृतपणे टाकण्यात येणारे रॅबिट डेब्रिज, माती टाकाऊ साहीत्य वस्तु असलेले एन्ट्री पॉईंट, ठिकाणे उदा. नॅशनल हायवे दोन्ही बाजु, घोडबंदरकडे जाणारा रस्ता, तिवारी कॉलेज, जे.पी. गार्डन, परिवहन डेपोच्या मागे जे.पी. इन्फ्रा समोरील रस्ता, डी. बी. रिॲलटी च्या जागा या ठिकाणी गस्त घालून भरलेले वाहने जर मार्गदर्शन सुचनांचे पालन करीत नसल्यास त्यांना थांबवून अशा वाहनांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर कामी महापालिका क्षेत्रात 04 ठिकाणी गस्ती पथक नेमणे आवश्यक आहे. तरी खालील प्रमाणे दिलेल्या तक्त्यात कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र | ठिकाणाचे नाव | गस्ती पथक | कर्मचाऱ्याचे नाव | कामाची वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | दहिसर चेक नाका | 1 | श्री. सागर घागस, शिपाई<br>श्री. रमेश गुजरे | सकाळी 7.00 ते दुपारी 3.00 |
| | | | श्री. सिध्देश शंकर मंजुळे, मजुर<br>श्री. किल्पी घर्शी | दुपारी 3.00 ते रात्री 11.00 |
| | | | श्री. भारत सोलंकी, सफाई कामगार<br>श्री. अफसर पठाण | रात्री 11.00 ते सकाळी 7.00 |
| 2 | माहेश्वरी भवन जवळ, भाईंदर पश्चिम | 2 | श्री. रोहित नरेश चंडालिया, सफाई कामगार<br>श्री. रोहित बोराडे, सफाई कामगार | सकाळी 7.00 ते दुपारी 3.00 |
| | | | श्री. एलिया राजन लक्ष्मण, सफाई कामगार | दुपारी 3.00 ते रात्री 11.00 |

| अ. क्र | ठिकाणाचे नाव | गस्ती पथक | कर्मचाऱ्याचे नाव | कामाची वेळ |
|---|---|---|---|---|
| | | | श्री. राजाराम मनगट्टी, सफाई कामगार | |
| | | | श्री. अक्षय नरेश घरत, शिपाई<br>श्री. नंदु बागारा, सफाई कामगार | रात्री 11.00 ते सकाळी 7.00 |
| 3 | छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ, घोडबंदर | 3 | श्री. वैभव भरत गायकवाड, सफाई कामगार<br>श्री. भानुदास मेहेर, सफाई कामगार | सकाळी 7.00 ते दुपारी 3.00 |
| | | | श्री. अय्यास्वामी कोरायस्वामी, सफाई कामगार<br>श्री. किरण गुस्सर, सफाई कामगार | दुपारी 3.00 ते रात्री 11.00 |
| | | | श्री. रमेश किणी, सफाई कामगार<br>श्री. गिल्बर्ट नुनीस, सफाई कामगार | रात्री 11.00 ते सकाळी 7.00 |

| अ.क्र. | भरारी पथक कर्मचाऱ्याचे नाव | कामाची वेळ |
|---|---|---|
| 4 | अमोल भोईर, सफाई कामगार<br>दिनेश मेगाल, सफाई कामगार | सकाळी 7.00 ते दुपारी 3.00 |
| | श्री. गंगाधर सदाशिव दोराई, मजुर<br>श्री. भरत घरत, सफाई कामगार | दुपारी 3.00 ते रात्री 11.00 |
| | श्री. तुषार भिवा खरात, सफाई कामगार<br>श्री. भरत पाटील, सफाई कामगार<br>श्री. भरत मनोहर शिंदे, सफाई कामगार | रात्री 11.00 ते सकाळी 7.00 |

तरी, वरील पथके शहरात येणारे डंपर, येणारे रेबिट, डेब्रिज, माती टाकाऊ साहीत्य वस्तु वाहनांची तपासणी करणे, बघणे, ताडपत्रीने झाकूण घेतली आहे का त्याची तपासणी करणे, माती, डेब्रीज रस्त्यावर पडत आहे की नाही याची तपासणी करणे शहरात सुरु असणाऱ्या विकास कामाची पाहणी करणे, ग्रिन नेट बसवले आहे का, टायर वॉशिंग सिस्टम कार्यान्वित आहे का, कच्चा माल व्यवस्थित झाकला आहे का याची पाहणी सदर गस्ती पथकांनी करावयाची आहे. तसेच पर्यावरण नियमांचे उल्लघंन करणाऱ्यावर पथकामार्फत दंडात्मक कार्यवाही तसेच गुन्हा दाखल करणे बाबतची कार्यवाही करावयाची आहे.

वरीलप्रमाणे आपणांवर सोपविलेली कामे चोखपणे पार पाडण्यात यावी. सदर कामामध्ये हलगर्जीपणा झाल्यास आपणांवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Kalpita Kishor Pimple
Date: 14-01-2025 17:08:51

(मा. आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)

उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका